# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## आस्थापना विभाग

## थेट मुलाखत

नागपूर शहरातील नागरीकांच्या सोयीस्तव तसेच प्रशासकीय कामकाजाचे सोयीने आयुक्त तथा प्रशासक यांचे सोशल मिडीया अकाउंट कार्यान्वीत करणे व त्याचे व्यवस्थापन करुन विविध कामांची माहिती तथा प्रसिध्दी नागरीकांपर्यन्त पोहचविण्याच्या उद्देशाने तसेच नागरीकांच्या तक्रारीवर नागरीकांना उत्तर देणे इत्यादी अनुषंगीक कामाकरिता **"सोशल मिडिया समन्वयक"** हे पद निव्वळ कंत्राटी तत्वावर प्रथमतः 6 महिन्याचे कालावधी करिता, रू. 25,000/- प्रति महिना एकमुस्त मानधनावर भरावयाचे आहे. इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखताकरिता आवश्यक कागदपत्रांसह दि. 21/02/2024 रोजी सकाळी 10 : 30 वाजता, अति. आयुक्त (सामान्य), नवीन प्रशासकीय इमारत, सिव्हील लाईन्स, नागपूर यांचे कार्यालय येथे उपस्थित राहावे.

| अ. क्र. | पदाचे नांव | एकुण पदे | वयोमर्यादा | शैक्षणिक पात्रता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| 1 | सोशल मिडिया समन्वयक | 01 | 45 वर्षे पेक्षा जास्त नसावी | 1) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी/ पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण असावा. 2) अर्जदाराला शासकीय/ निमशासकीय विभागाच्या प्रकल्प अथवा योजनांचा समाज माध्यमातून प्रचार प्रसार करण्याचा व्यावसायीक अनुभव आवश्यक (अनुषंगीक कागदपत्रे जोडणे आवश्यक) 3) मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांचे ज्ञान असणे आवश्यक 4)आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराचे कौशल्य असावे, समाजमाध्यमाची जाण असावी आणि समाज माध्यमांवर सक्रीय असावा, 5) संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक |

उपरोक्त पदाकरीता अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावयाचा असून, अर्जाचा नमुना व उक्त पदांकरीता आवश्यक अर्हता/अटी/शर्ती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर उपलब्ध आहे.

डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका, नागपूर

**Advt. No. 1002 PR Date 12.02.2024**